॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥

# गौड ब्राह्मण सभा

(स्थापना १८९७)

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये नोंदलेली विश्वस्तसंस्था

[नोंदणी क्रमांक अ. ८३२ (मुंबई)]

## १२० वा
## वार्षिक अहवाल
वर्ष २०१६-२०१७

(दि. ०१-०४-२०१६ ते दि. ३१-०३-२०१७)

-: कार्यालय :-

३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

दूरध्वनी क्रमांक : (०२२) २३८२१६७५

।। श्री ।।

# गौड ब्राह्मण सभा

## १२० व्या वार्षिक साधारण सभेची सूचना

सन्माननीय सभासद,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष-

गौड ब्राह्मण सभा या संस्थेची १२०वी वार्षिक साधारण सभा रविवार दि. २६/११/ २०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता टोपीवाला वाचनालय सभागृह, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, गिरगाव, मुंबई-४०० ००४. येथे आयोजित करण्यात आली आहे. तरी सभासदांनी सभेस वेळेकर उपस्थित राहावे, ही विनंती.

## * सभेपुढील कामकाज *

१) संस्थेचा ११९ वा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर दिवंगत झालेल्या सभासद बंधू-भगिनींना श्रध्दांजली वाहून दुखवट्याचा ठराव मंजूर करणे.

२) दिनांक ०४-१२-२०१६ रोजी पार पडलेल्या संस्थेच्या ११९व्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

३) सन २०१६-२०१७च्या वार्षिक अंदाजपत्रकाबाहेर झालेल्या जादा खर्चास मंजुरी देणे.

४) सन २०१६-२०१७ या कालावधीचा संस्थेचा १२०वा वार्षिक अहवाल, तसेच अधिकृत लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेले आयव्यय पत्रक व ताळेबंद व त्यावरील त्यांचा अहवाल विचारात घेऊन मंजूर करणे.

५) सन २०१७-२०१८ या वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणे.

६) सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता अधिकृत लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांच्या मानधनास मंजुरी देणे.

७) सन २०१७-२०२० या त्रैवार्षिक कालावधीकरिता विश्वस्तांच्या एका जागेसाठी तसेच कार्यकारी मंडळ सदस्य पदाच्या चार जागांसाठी पार पडलेल्या त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल जाहीर करणे व त्यास मंजुरी देणे.

८) माननीय अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या आयत्या वेळेच्या कामांचा विचार करणे.

आपले नम्र,

**मुंबई,**

**दिनांक : २२/१०/२०१७**

**सुभाष दत्तात्रय वाघ, सतीश गजानन सामंत**

(चिटणीस)

---

**टीप :**

१) घटनेतील नियम २२ अनुसार गणसंख्येअभावी सदर सभा तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी, त्याच जागी, त्याच कामांचा विचार करण्यासाठी पुन्हा अर्ध्या तासानी भरेल व अशा सभेस गणसंख्येची गरज भासणार नाही.

२) कामकाजासंबंधीचे लेखी ठराव, सूचना अथवा प्रश्न असल्यास ते लेखी स्वरूपात संस्थेच्या कार्यालयात सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवसाव्यतिरिक्त इतर दिवशी वार्षिक साधारण सभेच्या तारखेपूर्वी किमान चार दिवस अगोदर आणून द्यावेत व त्याची रीतसर पोच घ्यावी.

# गौड ब्राह्मण सभा

## १२० वा वार्षिक अहवाल

(दि. १ एप्रिल २०१६ ते दि. ३१ मार्च २०१७)

सन्माननीय सभासद,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष -

गौड ब्राह्मण सभा या संस्थेचा १२०वा (दि.१ एप्रिल २०१६ ते दि. ३१ मार्च २०१७ या कालावधीचा) वार्षिक अहवाल आपणास सादर करताना व्यवस्थापक मंडळास आनंद होत आहे. अहवालासोबत अधिकृत लेखापरीक्षकांनी तपासलेले दि. १ एप्रिल २०१६ ते दि. ३१ मार्च २०१७ या कालावधीचे आयव्यय पत्रक व दि. ३१ मार्च २०१७ अखेरचा ताळेबंद जोडलेला आहे. त्यावरून आपणास संस्थेच्या आर्थिक स्थितीची कल्पना येईल.

### • श्रध्दांजली :

संस्थेचा ११९ वा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर संस्थेच्या पुढील सभासदांचे निधन झाल्याचे सभासदांस कळविण्यात आम्हाला दु:ख होत आहे.

श्री. जयवंत बाळकृष्ण नाईक (गिरगाव), श्री. मनोहर शंकर कोचरेकर (गिरगाव), श्री. दिनेश चिंतामण वाघ (वाळकेश्वर), श्री. गीता नीलकंठ सामंत (काँग्रेस हाऊस, (ऑपेरा हाऊस), श्री. सुधाकर रावजी सामंत (दादर), श्री. जगन्नाथ भगवंत महाजन (वांद्रे), श्री. कन्हयालाल रघुनाथ सामंत (अंधेरी), श्री. मोतीलाल नाराराण तेंडोलकर (जोगेश्वरी), श्री. वसंत विष्णू देसाई (गोरेगाव), श्री. सुभाष गोविंद नेरुरकर (गोरेगाव), श्री. श्रीरंग परशुराम बागलकर (गोरेगाव), श्री. दिनेश प्रभाकर परुळेकर (विक्रोळी), श्री. नीतीन त्रिंबक परुळेकर (विक्रोळी), श्री.नरसिंह पुरुषोत्तम सामंत (ठाणे), श्री. शशीकांत नारायण पंतवालावलकर (मुणगे, आचरे), श्री. अरुण बळीराम महाजन (मुंबई).

वरील सर्व सभासद तसेच अहवालसाली समाविष्ट न झालेले अनेक जुने सभासद व हितचिंतक ज्यांच्या निधनाची नोंद संस्थेच्या दफ्तरी नाही त्या सर्वांना त्यांचे संस्थेवरील ऋण मान्य करून आम्ही त्यांना संस्थेच्यावतीने आदरपूर्वक श्रध्दांजली वाहत आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो !

### • वार्षिक साधारण सभा :

अहवालसाली संस्थेची ११९ वी वार्षिक साधारण सभा दि.०४/१२/२०१६ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे, वार्षिक अहवाल, जमाखर्च, वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणे, लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे, त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल जाहीर करणे, क्रीडामहोत्सव - २०१७ चे आयोजन करण्याकरिता मंजुरी घेणे इत्यादी कामे पार पडली.

### • त्रैवार्षिक निवडणूक (२०१६-२०१९) :

अहवालसाली संस्थेच्या घटना क्र.१० व ५५ अन्वये सन २०१६-२०१९ या कालावधीकरिता संस्थेची त्रैवार्षिक निवडणूक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार सदर निवडणुकीला उभ्या असलेल्या खालील उमेदवारांची

संस्थेच्या विश्वस्त व कार्यकारी मंडळ सदस्यपदी बिनविरोध निवड झाली आहे.

- **विश्वस्तांच्या एका जागेसाठी (२०१६-२०१९) :** प्रा. जगदीश साबाजी वालावलकर
- **कार्यकारी मंडळ सदस्यपदाच्या चार जागांसाठी (२०१६-२०१९) :**

(१) श्री. मनीष गुरुदास दाभोलकर (२) श्री. सुभाष दत्तात्रय वाघ (३) श्री. मधुकर दयानंद सामंत (४) श्री. अनिकेत रवींद्र वालावलकर

- **संस्थेचे पदाधिकारी :**

संस्थेचे विश्वस्त, अध्यक्ष व उपाध्यक्ष वेळोवेळी संस्थेत येऊन तसेच कामाची माहिती घेऊन आवश्यक त्या सूचना व सल्ला देत असतात. या सर्वांचे संस्थेला नेहमीच मार्गदर्शन मिळत असते.

- **कार्यकारी मंडळ :**

अहवालसाली कार्यकारी मंडळाच्या एकूण १० सभा पार पडल्या. या सभांतून मागील सभांची इतिवृत्ते मंजूर करणे, आजीव सभासदत्वाचे अर्ज मंजूर करणे, वार्षिक अहवाल, वार्षिक अंदाजपत्रक, जमाखर्च मंजूर करणे, त्रैवार्षिक निवडणूक आयोजित करणे, आर्थिक मदतीचे अर्ज मंजूर करणे, गौड ब्राह्मण त्रैमासिक प्रकाशन इत्यादी कामे पार पडली. कार्यकारी मंडळाचे बहुतेक सदस्य संस्थेच्या दैनंदिन कामकाजातही भाग घेत असतात. सदर सभांना सदस्यांची उपस्थिती पुढीलप्रमाणे होती.

**कार्याध्यक्ष :** श्री. उमाकांत गणपत महाजन-१०, **चिटणीस :** श्री. सुभाष दत्तात्रय वाघ-९, श्री. सतीश गजानन सामंत-९, **खजिनदार :** श्री. मनीष गुरुदास दाभोलकर-१०, **कार्यकारी मंडळ सदस्य :** सर्वश्री जगजीवन श्रीकांत प्रभु- ९, पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक-७, विजय श्रीपाद वालावलकर-२, आदित्य पंढरीनाथ सरनाईक-२, प्रसाद जोगदेव प्रभु बांबर्डेकर-०, मधुकर दयानंद सामंत (दि. ४/१२/२०१६ पासून)-१, अनिकेत रवींद्र वालावलकर (दि. ४/१२/२०१६ पासून)-१, श्री. दिनेश प्रभाकर परुळेकर (दि. ०७/१२/२०१७ पर्यंत)-८

- **संस्थेचे सभासद :**

अहवालसाली संस्थेचे एकूण ९० नवीन तहह्यात (आजीव) सभासद झाले. या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

- **देणग्या :**

अहवालसाली आपल्या ज्ञातीतील थोर दानशूर स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील तसेच स्व. श्री. विष्णू मंगेश पाटील (विलेपार्ले) यांनी आपल्या Probated इच्छापत्रात व्यक्त केलेल्या इच्छेनुसार सदर इच्छापत्राचे कार्यकारी विश्वस्त 'दि महाराष्ट्र इक्झेक्यूटर ॲण्ड ट्रस्टी कं.प्रा. लि.,' यांच्याकडून संस्थेला रु.७४,००,०००/- (रु. चौऱ्याहत्तर लाख फक्त) इतकी देणगी प्राप्त झाली असून स्व. श्री. विष्णू मंगेश पाटील यांनी आपल्या इच्छापत्रात नमूद केल्यानुसार संस्थेकडे सध्या अस्तित्वात असलेले पूर्वीचे दोन कोष- **स्व. श्रीमती ल. बा. पाटील स्म. कु. दे. गौ. ब्रा. महिला विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष–** रु.४,५५,०००/- (पूर्वीची रक्कम) + रु.१४,९७,५००/- (अहवालसाली अधिक भर) एकूण रु.१९,५२,५००/-, **स्व. श्रीमती ल.बा. पाटील स्म. कु. दे.गौ.ब्रा. निराश्रित महिला साहाय्यकारी कोष–** रु.४,५५,०००/- (पूर्वीची रक्कम) + रु.१४,९७,५००/-, (अहवालसाली अधिक भर) एकूण रु.१९,५२,५००/- तसेच अहवालसाली नव्याने गठीत केलेले चार कोष- **स्व.श्रीमती ल.बा. पाटील**





**स्म.कु.दे. गौ.ब्रा. मतीमंद साहाय्य कोष–** रु.१९,५२,५००/-, **स्व. श्रीमती ल. बा. पाटील स्म. कु. दे. गौ.ब्रा. रुग्णसेवा कोष–** रु.१९,५२,५००/-, **स्व. श्रीमती गौरी व स्व. श्री. मंगेश पाटील स्म. कु. दे. गौ. ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष–** रु.२,५०,०००/-, **स्व. श्रीमती लीला व स्व. श्री. दामोदर सामंत स्म. कु.दे.गौ.ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष–** रु.२,५०,०००/-, अशा एकूण सहा कोषांमध्ये सदर देणगीची रक्कम (दात्यांच्या इच्छेनुसार) विभागण्यात आली आहे.

अहवालसाली आजीव सभासदत्वापोटी तसेच संस्थेच्या इतर विविध कायम निधी फंडांकरिता ज्ञातीतील अन्य दानशूर व्यक्तींकडूनदेखील संस्थेला भरीव देणग्या प्राप्त झाल्या आहेत. संस्था ह्या सर्वांची अत्यंत ऋणी आहे. देणगीदार व देणग्यांचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट–१** मध्ये छापण्यात आला आहे.

- **विशेष उपक्रम :**

अहवालसाली संस्थेतर्फे विविध उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासात आले. त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्मरणार्थ**

**कु. दे. गौ.ब्रा. निराश्रित महिला साहाय्यकारी कोष :**

आपल्या ज्ञातीतील गरीब, निराधार व निराश्रित महिलांना अपमानित जीणे जगावे लागू नये या भावनेने ज्ञातीतील दानशूर स्व.श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील तसेच अहवालसाली स्व.श्री.विष्णू मंगेश पाटील यांनी **"स्व.श्रीमती लक्ष्मीबाई बा. पाटील स्म.कु.दे.गौ.ब्रा. निराश्रित महिला साहाय्यकारी कोषा"** करिता दिलेल्या अनुक्रमे रु.४,५५,०००/- (पूर्वीची रक्कम) + रु.१४,९७,५००/- (अहवालसाली अधिक भर) अशी एकूण रु.१९,५२,५००/- या कायम निधी देणगीच्या व्याजातून निराश्रित महिलांना उपजीविकेसाठी संस्थेतर्फे आर्थिक मदत दिली जाणार आहे. ज्ञातीतील निराश्रित महिलांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्मरणार्थ**

**कु. दे. गौ. ब्रा. विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष :**

आपल्या ज्ञातीतील होतकरू, गरजू व गरीब मुलींच्या शिक्षणाकरिता तसेच त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहाता यावे म्हणून आपल्या ज्ञातीतील दानशूर स्व.श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील तसेच अहवालसाली स्व.श्री. विष्णू मंगेश पाटील यांनी **"स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्म. कु. दे. गौ. ब्रा. विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोषा"** करिता दिलेल्या अनुक्रमे रु.४,५५,०००/- (पूर्वीची रक्कम) + रु.१४,९७,५००/- (अहवालसाली अधिक भर) अशी एकूण रु.१९,५२,५००/- या कायम निधी देणगीच्या व्याजातून ज्ञातीतील होतकरू, गरीब, गरजू विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती दिली जाते.

अहवालसाली अशा विद्यार्थिनींना सदर कोषातून रु.४०,०००/-इतक्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. त्याबाबतचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट–२** मध्ये छापण्यात आला आहे.

- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्मरणार्थ**

**कु .दे.गौ.ब्रा. मतीमंद साहाय्य कोष:**

अहवालसाली ज्ञातीतील एक दानशूर व्यक्ती स्व. श्री. विष्णू मंगेश पाटील यांनी स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण





पाटील यांच्या स्मरणार्थ **"स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्म. कु.दे.गौ.ब्रा.मतीमंद साहाय्य कोषा"** करिता दिलेल्या रु.१९,५२,५००/- या कायम निधी देणगीच्या व्याजातून ज्ञातीतील मतीमंदांना विशेषत: मतीमंद मुलीं व महिलांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत दिली जाते.

अहवालसाली सदर कोषातून कु. प्रथमेश शंकर सामंत (कुडाळ) या मतीमंद मुलाला रु. २०,०००/- इतकी आर्थिक मदत देण्यात आली. त्याबाबतचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट–८** मध्ये छापण्यात आला आहे.

- **स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्मरणार्थ**

**कु. दे. गौ. ब्रा. रुग्णसेवा कोष:**

अहवालसाली आपल्या ज्ञातीतील एक दानशूर व्यक्ती स्व. श्री. विष्णू मंगेश पाटील यांनी स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील यांच्या स्मरणार्थ **"स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील स्म. कु.दे. गौ. ब्रा. रुग्णसेवा कोषा"** करिता दिलेल्या रु. १९,५२,५००/- या कायम निधी देणगीच्या व्याजातून ज्ञातीतील रुग्णांना विशेषत: महिला रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. ज्ञातीतील रुग्णांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

- **स्व. श्रीमती गौरी व स्व. श्री. मंगेश पाटील स्मरणार्थ**

**कु.दे.गौ.ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष:**

अहवालसाली ज्ञातीतील एक दानशूर व्यक्ती स्व. श्री. विष्णू मंगेश पाटील यांनी स्व. श्रीमती गौरी व स्व. श्री.मंगेश पाटील यांच्या स्मरणार्थ **"स्व. श्रीमती गौरी व स्व. श्री. मंगेश पाटील स्म. कु.दे. गौ. ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोषा"** करिता दिलेल्या रु.२,५०,०००/- या कायम निधी देणगीच्या व्याजातून शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील होतकरू, गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ज्ञातीतील गरजू विद्यार्थ्यांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

- **स्व. श्रीमती लीला व स्व. श्री. दामोदर सामंत स्मरणार्थ**

**कु.दे. गौ. ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोष :**

अहवालसाली ज्ञातीतील एक दानशूर व्यक्ती स्व. श्री. विष्णू मंगेश पाटील यांनी स्व. श्रीमती लीला व स्व. श्री. दामोदर सामंत यांच्या स्मरणार्थ **"स्व. श्रीमती लीला व स्व. श्री. दामोदर सामंत स्म. कु.दे.गौ. ब्रा. विद्यार्थी विद्यावृद्धी कोषा"** करिता दिलेल्या रु.२,५०,०००/- या कायम निधी देणगीच्या व्याजातून शहराव्यतिरिक्त फक्त ग्रामीण भागातील ज्ञातीतील होतकरू, गरजू, गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ज्ञातीतील गरजू विद्यार्थ्यांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

- **स्व. श्री. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर स्मरणार्थ**

**कु.दे.गौ.ब्रा. निराश्रित महिला/पुरुष साहाय्यकारी कोष:**

आपल्या ज्ञातीतील गरीब, निराधार, निराश्रित व गरजू महिला/पुरुषांना त्यांच्या 'उपजीविकेसाठी आर्थिक मदत दिली जावी या भावनेने ज्ञातीतील एक दानशूर श्री. अरविंद लक्ष्मण पाटील पाटकर (पनवेल) यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ **"स्व. श्री. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर कु.दे.गौ.ब्रा. निराश्रित महिला/पुरुष**





**साहाय्यकारी कोषा"** करिता दिलेल्या रु. २,५०,०००/- या कायमनिधी फंडाच्या देणगीच्या व्याजातून आर्थिक मदत दिली जाते.

अहवालसाली ज्ञातीतील गरीब, निराधार, गरजू व निराश्रित महिला/पुरुषांना सदर कोषातून रु.५०,०००/- इतक्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले. त्याबाबतचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट–३** मध्ये छापण्यात आला आहे.

- **स्व. श्रीमती अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर स्मरणार्थ**

**कु.दे.गौ.ब्रा. महिला विद्यार्थी/विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोष:**

आपल्या ज्ञातीतील गरीब, निराधार, निराश्रित, गरजू विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता आर्थिक मदत दिली जावी या भावनेने ज्ञातीतील एक दानशूर श्री. अरविंद लक्ष्मण पाटील पाटकर (पनवेल) यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मरणार्थ **"स्व. श्रीमती अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर कु.दे.गौ.ब्रा. निराश्रित विद्यार्थी/विद्यार्थिनी विद्यावृद्धी कोषा"** करिता दिलेल्या रु.२,५०,०००/- या कायमनिधी फंडाच्या देणगीच्या व्याजातून आर्थिक मदत दिली जाते.

अहवालसाली ज्ञातीतील गरीब, गरजू, निराधार, निराश्रित, होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनींना सदर कोषातून रु.२७,०००/- इतक्या आर्थिक मदतीने वाटप करण्यात आले, त्याबाबतचा तपशील इतरपत्र **परिशिष्ट–४** मध्ये छापण्यात आला आहे.

- **वृद्धाश्रम फंड:**

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेच्या **"वृद्धाश्रम फंडा"** करिता आतापर्यंत दिलेल्या रु. २,९२,६९१/- इतक्या देणगीच्या व्याजातून ज्ञातीतील ७० वर्षांवरील निराश्रित, निराधार, गरीब, गरजू, आजारी वयोवद्धांना वर्षातून एकदा आर्थिक मदत दिली जाते. मात्र यासाठी अशा वयोवृद्धांनी आपले संपूर्ण नाव, पत्ता, गोत्र, वय, कुटुंबाचे एकूण उत्पन्न, आजारी असल्यास आजाराविषयीची माहिती, त्यावर होणारा वार्षिक खर्च, दूरध्वनी/मोबाईल क्र. आदि माहितीसह संस्थेकडे लेखी अर्ज करावेत. छापील अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. विनंतीनुसार अर्ज टपालाद्वारेदेखील पाठविले जातात. ज्ञातीतील गरजू, आजारी वयोवृद्धांनी याचा अवश्य लाभ घ्यावा.

- **वैद्यकीय फंड :**

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेच्या **"वैद्यकीय फंडा"** करिता दिलेल्या देणगीच्या व्याजातून ज्ञातीतील निराश्रित, निराधार, गरीब, गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत दिली जाते. संस्थेच्या या कायम निधी फंडामध्ये दि.३१ मार्च २०१६ पर्यंत रु.११,२५,९०७/- इतका निधी जमा झाला होता. अहवालसाली (दि.३१ मार्च २०१७ पर्यंत) सदर फंडात रु.१,३४,९००/- इतक्या देणगीची भर पडली आहे. त्याबाबतचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट–१** मध्ये छापण्यात आला आहे.

अहवालसाली या फांडातून रु. ९५,०००/- इतक्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले, त्याबाबतचा तपशील इतरत्र **परिशिष्ट–५** मध्ये छापण्यात आला आहे.

या क्रीडामहोत्सवाच्या आयोजनाला गौड ब्राह्मण सभेचे मार्गदर्शन आणि शुभेच्छा तर होत्याच शिवाय या क्रीडामहोत्सवाच्या आयोजनाला आर्थिक हातभार लावत गौड ब्राह्मण सभेने ''अ.भा. कु.दे.गौ. ब्रा. समाज पनवेल'' या संस्थेला (क्रीडामहोत्सवाचे आयोजक) रु.१,००,०००/- देणगी दिली. ज्ञातीतील गौड युनियन स्पोर्टस क्लबनेदेखील रु.५०,०००/- देणगी आयोजकांना देऊन क्रीडामहोत्सव यशस्वी करण्यास विशेष हातभार लावला. क्रीडामहोत्सवाच्या आयोजनाच्या अन्य खर्चासाठी कु.दे.गौ.ब्रा. क्रेडिट सोसायटी लि., (गिरगाव), कु.दे.गौ.ब्रा. समाज (विक्रोळी), कु.दे.गौ.ब्रा. सहयोग (डोंबिवली), कु.दे.गौ. ब्रा. समाज (गोरेगाव), कु.दे.गौ.ब्रा. समाज (पुणे), कु.दे.गौ.ब्रा. समाज (बेळगाव) तसेच ज्ञातीतील अनेक दानशूर व्यक्तींनी आर्थिक साहाय्य केल्याबद्दल गौड ब्राह्मण सभेच्यावतीने आम्ही या सर्वांचे विशेष आभार मानत आहोत. या क्रीडामहोत्सवाला सर्वश्री डॉ. विलास देसाई (अध्यक्ष, गौड ब्राह्मण सभा), गंगाधर (भाऊ) सामंत (अध्यक्ष, क्रीडा महोत्सव समिती, पनवेल), न.ना. पंतवालावलकर (अध्यक्ष, विद्यावृद्धी समाज, गिरगाव), उत्हास पाटकर (अध्यक्ष, कु.दे.गौ.ब्रा. स्नेहवर्धक संघ (बोरीवली), मधुकर सामंत (अध्यक्ष, कु.दे.गौ.ब्रा. समाज (पुणे), यतीन ठाकूर (कार्यवाह, कु.दे.गौ.ब्रा. समाज (पनवेल), सुरेंद्र नायक (मेंगलोर), विभाकर नाईक (अध्यक्ष, अ.भा.कु.दे.गौ.ब्रा. समाज पनवेल), क्रीडा महोत्सवाचे शिल्पकार मनीष दाभोलकर (अध्यक्ष, कु.दे.गौ.ब्रा. समाज (गोरेगाव), खजिनदार, गौड ब्राह्मण सभा, गिरगाव), आदिनाथ पाटकर आदि मान्यवर व अन्य क्रीडारसिक आवर्जून उपस्थित होते. सदर क्रीडामहोत्सवाला मुंबई, कोकण, बेळगाव, गोवा, कर्नाटक आदि भागातील ज्ञातीतील क्रीडारसिकांची उपस्थितीदेखील विशेष उल्लेखनीय होती. या क्रीडामहोत्सवाला प्रतिवर्षी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळतोय हे विशेष!

## वधू-वर पालक मेळावा :

संस्थेचे आजीव सभासद, माजी पदाधिकारी **श्री. बाळासाहेब पंतवालावलकर** यांच्या प्रेरणेने सुरू झालेला '**वधू-वर पालक मेळावा**' आजही प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यात संस्थेतर्फे आयोजित केला जातो.

अहवालसाली संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनाचे औचित्य साधून संस्थेचा **वधू-वर पालक मेळावा** शनिवार दि. २५ डिसेंबर २०१६ रोजी रोजी सकाळी १० ते १ या वेळेत संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. विलास देसाई यांच्या अध्यक्षतेखाली शारदाश्रम विद्यामंदिराच्या दत्तमंदिर सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

अहवालसाली वधू-वरांनी आपल्या नावाची संस्थेकडे रीतसर नोंदणी केली. त्याद्वारे संस्थेला देणगीरूपाने रु.१६,५५७/- इतक्या रकमेचे नोंदणी शुल्क प्राप्त झाले. या कार्यक्रमाचे सूत्र-संचालन सभेचे चिटणीस श्री. सतीश सामंत यांनी केले. सदर मेळाव्याला सर्वश्री आप्पा सामंत, किरण सामंत, नागेश पाटील सौ. वंदना दाभोलकर, सौ.अंजली (मंगल) मार्तोंडकर, कु. श्रद्धा प्रभु, श्रीमती रोहिणी कोचरेकर आदिंचे उदंड सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमाला वधू-वर, पालक, त्यांचे नातेवाईक, ज्ञातीसंस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. शेवटी सभेचे चिटणीस श्री. सतीश सामंत यांनी उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सदर मेळाव्याची यशस्वी सांगता झाली.

## • अन्य विशेष :

अहवालसाली अन्य उपक्रमदेखील संस्थेतर्फे यशस्वीपणे राबविण्यात आले. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.





## • रुग्णसेवा:

ज्ञातीतील गरजू व रुग्ण व्यक्तींना संस्थेतर्फे व्हीलचेअर, एअरबेड, वॉटरबेड, बर्फाची पिशवी, गरम पाण्याची पिशवी, बेडपॅन, इत्यादी उपकरणे परत करण्याच्या बोलीवर वापरासाठी विनामूल्य पुरविली जातात.

अहवालसाली १० गरजू रुग्णांनी या सुविधेचा लाभ घेतला.

## • दुर्मीळ साहित्य संग्रह फंड:

गौड ब्राह्मण ज्ञातीविषयक दुर्मीळ साहित्य, त्याबाबतचा इतिहास, दुर्मीळ ग्रंथ, फोटो, ऑडिओ, व्हिडिओ इत्यादींचे जतन व संवर्धन करून त्याबाबतची माहिती गौड ब्राह्मण त्रैमासिकाच्या माध्यमातून ज्ञातीबांधवांपर्यंत पोहचविण्यासाठी दुर्मीळ साहित्याचा अमोल ठेवा ज्ञातीबांधवांकडे पडून असल्यास तो गौड ब्राह्मण सभेकडे सुपूर्त करावा. त्याचे संस्थेतर्फे योग्य तऱ्हेने जतन व संवर्धन केले जाईल. या उपक्रमासाठी अर्थातच आर्थिक साहाय्याची आवश्यकता आहे. या फंडाच्या व्याजातून या प्रकल्पावर खर्च केला जाणार आहे. ज्ञातीतील दानशूरांनी यासाठी सढळ हस्ते आर्थिक साहाय्य करण्यासाठी आम्ही त्यांना विशेष आवाहन करीत आहोत.

अहवालसाली संस्थेचे आजीव सभासद श्री. शंकर उर्फ प्रकाश गोविंद ठाकूर (डोंबिवली) यांनी '**मठगावचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश**' (लेखक- रावबहादूर वासुदेवराव बांबर्डेकर) या दुर्मीळ ग्रंथाची प्रत तसेच श्री. विठ्ठल वामनराव खोत (सांताक्रुज) यांनी आपल्याकडील "ENCYCLOPPEDIA BRITANNICA" या दुर्मीळ ग्रंथाचे २१ भाग संस्थेला भेटीदाखल दिले आहेत. संस्थेच्यावतीने आम्ही त्यांचे आभारी आभारी आहोत. संस्थेच्या ह्या उपक्रमाला जातीबांधवांकडून उत्तम प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे.

## आवाहन :

'**गौड ब्राह्मण सभा**' या संस्थेच्या संस्थापनेला १२० वर्षे पूर्ण होत आहेत तर गौड ब्राह्मण सभेतर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या '**गौड ब्राह्मण**' या त्रैमासिकाने ७८ वर्षात पदार्पण केले आहे हे नमूद आम्हाला विशेष अभिमान वाटतो आहे. ज्ञातीतील उद्योजक, हितचिंतक तसेच विविध बँकांकडून जाहिरातरूपाने मिळणाऱ्या देणग्यांतून छपाईचा खर्च भागविला जातो. मात्र दिवसेंदिवस छपाईच्या खर्चात सातत्याने वाढ होत असल्याने त्रैमासिकाच्या फंडात भरीव वाढ होणे अत्यावश्यक आहे. ज्ञातीबांधवांनी आपला ओळखीपाळखीचा उपयोग करून त्रैमासिकाला जाहिराती तसेच त्रैमासिक फंडाकरिता देणग्या देऊन सदर त्रैमासिकाची वाटचाल अखंड चालू ठेवण्यास हातभार लावावा ही विनंती. संस्थेतर्फे राबविल्या जाणाऱ्या विविध समाजपयोगी उपक्रमांनादेखील ज्ञातीतील उदार दात्यांनी संस्थेला भरघोस देणग्या देण्यासाठी आम्ही त्यांना विशेष आवाहन करीत आहोत.

## • ऋणनिर्देश :

संस्थेचा हा १२० वा वार्षिक अहवाल पूर्ण करण्यापूर्वी काही संस्था व व्यक्ती यांचे आभार मानणे अगत्याचे आहे. प्रथम संस्थेच्या सर्व सभासदांचे, हितचिंतकांचे विशेषतः दैनंदिन कारभारात मौलिक सूचना व सहकार्य करणाऱ्या सभासदांचे आम्ही विशेष आभार मानत आहोत.





## • स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर स्मरणार्थ कर्करोग वैद्यकीय उपचार फंड :

सहकार महर्षी, अर्थतज्ज्ञ, माजी खासदार, सारस्वत को. ऑप. बँकेचे माजी अध्यक्ष, गौड ब्राह्मण सभेचे माजी विश्वस्त स्व. श्री.एकनाथ केशव ठाकूर ह्यांच्या स्मरणार्थ गौड ब्राह्मण सभेच्यावतीने ''**स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर स्म. कर्करोग वैद्यकीय उपचार फंड**'' या नावाने कायमनिधी फंड उभारण्यात आला असून या फंडात एक कोटीचे उद्दिष्ट गाठण्याचा संस्थेचा मानस आहे. संस्थेचे खजिनदार श्री. मनीष दाभोलकर यांच्या पुढाकाराने आणि संकल्पनेतून साकारलेल्या या फंडामध्ये दि.३१ मार्च २०१६ पर्यंत रु. २०,४४,२०३/- इतका निधी देणगीरूपाने जमा करण्यास संस्थेला कमालीचे यश प्राप्त झाले आहे हे विशेष! अहवालसाली दि.३१ मार्च २०१७ पर्यंत सदर फंडात रु.७,७६,००४/- इतक्या रकमेची भर पडली हे नमूद करायला आम्हाला विशेष आनंद होतो आहे. त्याबाबतचा देणगीचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट-१** मध्ये छापण्यात आला आहे. सदर फंडाच्या रकमेच्या व्याजातून ज्ञातीतील कर्करोगग्रस्तांना वैद्यकीय उपचारासाठी संस्थेतर्फे आर्थिक मदत दिली जाते.

अहवालसाली सदर फंडातून रु. १,२०,०००/- इतक्या आर्थिक मदतीचे वाटप करण्यात आले. त्याबाबतचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट-६** मध्ये छापण्यात आला आहे.

## • कन्यादान फंड:

ज्ञातीतील दानशूरांनी ''**कन्यादान फंडा**'' करिता आतापर्यंत दिलेल्या रु.५,७४, ९२१/- इतक्या देणगीच्या व्याजातून ज्ञातीतील गरीब, गरजू कुटुंबातील मुलींच्या विवाहाप्रीत्यर्थ संस्थेतर्फे आर्थिक मदत दिली जाते.

अहवालसाली ज्ञातीतील कु. सोनाली मधुसूदन नाईक (गोळवण, मालवण) हिच्या विवाहाप्रीत्यर्थ सदर फंडाच्या व्याजातून रु.२०,०००/- इतकी आर्थिक मदत देण्यात आली. त्या बाबतचा तपशील अहवालात इतरत्र **परिशिष्ट-७** छापण्यात आला आहे.

## • सामुदायिक मौजीबंधन फंड :

गौड ब्राह्मण सभा, प्रतिवर्षी ज्ञातीतील बटूंसाठी मौजीबंधनाचा सोहळा आयोजित करीत असते. अहवालसाली हा सोहळा रविवार दि. २८/०४/२०१६ रोजी सकाळी ८.३० ते १२ या वेळेत कुडाळदेशकर ब्राह्मण निवासातील टोपीवाला वाचनालयाच्या सभागृहात, श्री. सामंत गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली मोठ्या उत्साहात पार पडला. सामंत गुरुजींनी देहशुद्धी पद्धतीने सक्षौर, पुण्यहावाचन आदि धार्मिक विधी अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने केले तसेच व्रतबंधनाचे धार्मिक महत्त्व, बटूंनी करावयाची उपासना व आचरण यांचे सुंदर विवेचन केले. कु. शशांक राहूल सामंत पुणे, या बटूवर मौजीबंधनाचे संस्कार करण्यात आले. सदर सोहळ्यास बटूचे आईवडील, मामा, अन्य नातेवाईक, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. शेवटी सर्वांनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर या सोहळ्याची सांगता झाली.

## • स्व.डी.जी. तेंडोलकर व्याख्यानमाला फंड:

ज्ञातीतील एक दानशूर व्यक्ती स्व.रा.ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी जानेवारी महिन्यामध्ये गिरगावातील ''**टोपीवाला ज्ञानमंडळा**'' तर्फे व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. यंदा ही व्याख्यानमाला दि. २५ जानेवारी ते दि. २९ जानेवारी २०१७ या कालावधीत कुडाळदेशकर ब्राह्मण निवासाच्या भव्य पटांगणात संपन्न झाली. या व्याख्यानमालेचे औचित्य साधून आपल्या ज्ञातीतील एक सुप्रसिद्ध पत्रकार,





चरित्रकार स्व. डी.जी. तथा दीनानाथ गोपाळ तेंडोलकर यांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन करण्याकरिता सदर व्याख्यानमालेतील शुभारंभाचे व्याख्यान **गौड ब्राह्मण सभेने** पुरस्कृत केले होते. व्याख्यानमालेतील शुभारंभाचे पुष्प गुंफण्याचा मान मिळाला तो ज्येष्ठ अभिनेते **श्री. जयंत सावरकर** यांना! 'माझा नाट्यप्रवास' या विषयावर त्यांनी आपल्या नाट्यजीवनातील अनेक आठवणींवर प्रकाश टाकला. सुरुवातीला गौड ब्राह्मण सभा व टोपीवाला ज्ञानमंडळाच्यावतीने गौड ब्राह्मण सभेचे उपाध्यक्ष श्री. देवदत्त आ. खानोलकर, चिटणीस श्री. सुभाष द. वाघ यांच्या हस्ते व्याख्याते जयंत सावरकर यांचा यथोचित सत्कार, सन्मान करण्यात आला. या व्याख्यानमालेला श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद लाभला हे विशेष! ''**स्व. डी. जे. तेंडोलकर व्याख्यानमाला**'' फंडाच्या व्याजातून गौड ब्राह्मण सभेतर्फे टोपीवाला ज्ञानमंडळ या संस्थेला रु.५,०००/- देणगी देण्यात आली. व्याख्यानमालेतील शुभारंभाचे व्याख्यान पुरस्कृत करण्यासाठी गौड ब्राह्मण सभेला संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल टोपीवाला ज्ञानमंडळाचे आम्ही आभारी आहोत.

## पारितोषिक फंड:

आपल्या ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी, त्यांचे नातेवाईक स्व.श्री. विनायक लक्ष्मण देसाई व स्व. श्रीमती द्रौपदी विनायक देसाई- (रु.३,०००/-), स्व.श्री. आत्माराम रामचंद्र देसाई- (रु.१,०००/-), स्व.श्री. विष्णू अनंत देसाई (रु.१२,००१/-), स्व. श्रीमती पार्वतीबाई शंकर देसाई- (रु.२,०००/-), स्व.श्री. राजाराम रघुनाथ सामंत- (रु.५,०००/-), स्व.श्रीमती सुशीलाबाई शंकर प्रभु केळुसकर (रु.६,००१/-), स्व.श्री. मिलिंद वामन सामंत- (रु.५,०००/-), स्व.श्री. आत्माराम सावळाराम खानोलकर- (रु.१०,०००/-), स्व. श्री. गजानन गोविंद गवाणकर- (रु.२५,०००/-), स्व.श्री. रघुनाथ राजाराम सामंत व स्व. श्रीमती सुनंदा रघुनाथ सामंत- (रु.२४,०००/-), स्व.श्री. पीतांबर दिगंबर देसाई- (रु.२०,०००/-), स्व. श्रीमती अवंतिका भास्कर खानोलकर- (रु.१०,०००/-), स्व. श्रीमती गुलाब रजनीकांत देसाई- (रु.१०,०००/-), स्व. श्री. भिकाजी शांताराम आजगावकर- (रु.५,०००/-), स्व.श्री. गजानन शंकर प्रभु- (रु.५१,०००/-) यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ, गौड ब्राह्मण सभेला दिलेल्या विविध पारितोषिक फंडांच्या व्याजातून दरवर्षी माध्यमिक शालान्त (एस.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा, उच्च माध्यमिक शालान्त (एच.एस.सी.) प्रमाणपत्र परीक्षा तसेच अन्य परीक्षांमध्ये विशेष गुणवत्ता संपादन केलेल्या ज्ञातीतील हुशार व होतकरू मुलां/मुलींना संस्थेतर्फे पारितोषिके व प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात येते.

अहवालसाली दि. २ ऑक्टोबर २०१६ रोजी '**कु. दे. गौ. ब्रा. विद्यावृद्धि समाज**' या ज्ञातीसंस्थेने ज्ञातीतील गुणवंत मुलांसाठी दादर (प) येथील शारदाश्रम विद्यामंदिर सभागृहात आयोजित केलेल्या कौतुक सोहळ्याचे औचित्य साधून '**गौड ब्राह्मण**' सभेतर्फे ज्ञातीतील हुशार व होतकरू विद्यार्थी/विद्यार्थिनींना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय **श्री. द.स. आजगावकर** यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रे व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

## • वार्षिक स्नेह-संमेलन व पारितोषिक वितरण समारंभ:

संस्थेचे दरवर्षी भरणारे वार्षिक स्नेह-संमेलन हे सभासदांसाठी आणि कार्यकर्त्यांसाठी एक आनंद मेळावाच असतो.

अहवालसाली रविवार दि. २५ डिसेंबर २०१६ रोजी संस्थेचे ११९ वे वार्षिक स्नेह-संमेलन व पारितोषिक

संस्थेचे अधिकृत लेखापरीक्षक 'मे. डी.एस. देसाई' आणि कंपनी चार्टर्ड अकाउंटन्ट, कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण निराश्रित सहाय्यकारी फंड, कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण क्रेडिट सोसायटी लि., टोपीवाला चॅरिटी ट्रस्ट, टोपीवाला ज्ञानमंडळ, शारदाश्रम विद्यामंदिर तसेच अन्य ज्ञातीसंस्था, संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे देणगीदार, संस्थेच्या त्रैमासिकाला जाहिरातरूपाने देणग्या देणारे दि. सारस्वत को-ऑप. बँक, लि., दि. नॉर्थ कॅनरा को-ऑप. बँक लि., सत्कार हॉटेल, गोरेगाव, फोंडाघाट फार्मसी, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., ज्युपिटर सर्व्हिसेस, युनिक फोटो ऑफसेट सर्व्हिसेस, आबा वालावलकर आणि कुटुंबीय, एस.एन. माईणकर ॲण्ड सन्स, आर. एच. सामंत ॲण्ड सन्स प्रा. लि., नीकीता इन्व्हेस्टमेन्टस, श्रीराम वेअरहाउसिंग एजन्सी, ॲनाटेक सर्व्हिसेस प्रा. लि., रामचंद्र केशव ॲण्ड कं., मे. तुकाराम लक्ष्मण देसाई, श्री फाइनॅन्शल सर्व्हिसेस, श्री तारादेवी, भगवती, ब्राह्मण धाडवस महादेव (पंचायतन) केळुस सेवा समिती, मुंबई, श्री. धनंजय प्रभुदेसाई (स्पॉट हाऊसिंग सोसायटी सोल्यूशन), मे. ग्रोमोटेक ॲग्रोकेम प्रा. लि., मे. एन. एस. बी. प्रॉपर्टीज, मे. नॅशनल केमिस्ट, मे. महाराष्ट्र सोसायटीज वेलफेअर असोशिएशन, शिवांग हॉलिडेज (माधवी), श्री. दिगंबर पुजारी, श्री. व्ही.डी. प्रभु केळुसकर, श्री. प्रदीप देसाई (स्वर-योग), कुडाळदेशकर गौड ब्राह्मण प्रीमिअर लीग क्रीडामहोत्सवाचे आयोजक अखिल भारतीय गौड ब्राह्मण समाज पनवेल, श्री. विभाकर नाईक (पनवेल), क्रीडामहोत्सवाच्या आयोजनासाठी आर्थिक साहाय्य करणाऱ्या ज्ञातीसंस्था तसेच संस्थेच्या प्रेमापोटी सौ. शिल्पा दाभोलकर, सौ. वंदना दाभोलकर, कु. श्रद्धा प्रभु, श्री. संजय वालावलकर, श्री. नागेश पाटील अशा अनेकांनी निरपेक्ष भावनेने दिलेले मौलिक सहकार्य, गौड ब्राह्मण त्रैमासिकासाठी नियमित लिखाण करणारे ज्ञातीबांधव (लेखक/कवी) तसेच गौड ब्राह्मण सभेच्या दैनंदिन कामकाजात नेहमीच मदतीचा हात पुढे करणाऱ्या **सौ. अंजली (मंगल) मार्तोंडकर** या सर्वांची गौड ब्राह्मण सभा अत्यंत ऋणी आहे.

अहवालसाली झालेले आजीव सभासद, देणगीदार, जाहिरातदार, ज्ञाती कार्यकर्ते, हितचिंतक, ज्यांच्या नावांचा नामनिर्देश येथे झालेला नाही, त्यांच्या उस्फूर्त साहाय्याबद्दल त्या सर्वांचे ऋण ही संस्था कृतज्ञतापूर्वक मान्य करीत आहे.

## • समारोप :

संस्थेचा १२० वा वार्षिक अहवाल आपणापुढे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. समाजात ज्ञातीबांधवांचे अस्तित्व अधिक प्रगतीपथावर नेण्यासाठी धडपड करणारी ही संस्था ज्ञातीबांधवांच्या सर्वांगीण विकासाकरिता कटिबद्ध आहे.

पुन्हा एकदा सर्वांचे आभार मानून संस्थेचा हा १२०वा वार्षिक अहवाल येथे समाप्त करीत आहोत.

धन्यवाद!

मुंबई,
दिनांक : २२/१०/२०१७

आपले स्नेहांकित,
सुभाष द. वाघ, सतीश गजानन सामंत
(चिटणीस)





Report of an auditor relating to accounts audited under sub-section (2) of section 33 & 34 and rule 19 of the Bombay Public Trusts Act.

Registration No: A - 832

Name of the Public Trust : GAUD BRAHMIN SABHA , MUMBAI

For the year ending : 31ST MARCH, 2017

| | | |
|---|---|---|
| (a) | Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules ; | YES. |
| (b) | Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts ; | YES. |
| (c) | Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts ; | YES. |
| (d) | Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him ; | YES. |
| (e) | Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office ,and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with ; | YES |
| (f) | Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him ; | YES |
| (g) | Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust ; | NO |
| (h) | The amounts of outstanding for more than one year and the amounts written off, if any ; | NIL |
| (i) | Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000/- ; | NO SUCH REPAIRS |
| (j) | Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35 ; | NO |
| (k) | Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions of Section 36 which have come to the notice of the auditor ; | NO |
| (l) | All cases of irregular, illegal or improper expenditure, or failure or omission to recover monies or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other property thereof, and whether such expenditure, failure, omission, loss or waste was caused in consequence of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust ; | NO SUCH CASES |
| (m) | Whether the budget has been filed in the form provided by rule 16 A ; | |
| (n) | Whether the maximum and minimum number of the trustees in maintained; | YES |
| (o) | Whether the meetings are held regularly as provided in such instrument ; | YES |
| (p) | Whether the minute books of the proceedings of the meeting is maintained | YES |
| (q) | Whether any of the trustees has any interest in the investment of the trust ; | NO |
| (r) | Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust | NO |
| (s) | Whether the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit ; | YES |
| (t) | Any special matter which the auditor may think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner. | NIL |

D.S. DESAI & CO. M.NO. 13730 MUMBAI-400 057

FOR D. S. DESAI & CO.
CHARTERED ACCOUNTANTS

MUMBAI, 31st AUGUST, 2017

(ARUN D. DESAI)
PARTNER